# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.मह/कक्ष १/टे ४-६/कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती/तक्रार अहवाल/२०२३ दि.२२/११/२०२३

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक २७१
दिनांक २९.११.२०२३
प्रशासकीय अधिकारी / उप वनसंरक्षक

**प्रति,**
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती तथा
उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई

**विषय :-** कांदळवन संरक्षण व संवध्रन संनियंत्रण समितीच्या २५ व्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करणेत येते की, कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची २५वी बैठक दि. १३/०९/२०२३ रोजी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग तथा अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने तक्रारींबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

| अ.क्र. | तक्रार | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| १ | **तक्रार क्र. १७**<br>**श्री. धिरज परब**<br>**दि. ०५/१२/२०१८**<br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मीरारोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | ➤ सदर तक्रारीचे अनुषंगाने अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांनी दि. १०/०६/२०२१ च्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे.<br>➤ सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी करण्यात आली असून स्थळपाहणीदरम्यान कांदळवनाचा ऱ्हास झालेबाबत निदर्शनास आल्याने तलाठी साझा नवघर यांचेमार्फत महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सोबत अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांचेकडील अहवालाची प्रत जोडली आहे.<br>➤ सबब सदरची तक्रार निकाली काढणेस विनंती आहे. |
| २ | **तक्रार क्र. ७६**<br>**श्री. धिरज परब**<br>**दि. २३.०४.२०१८**<br>भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार. | ➤ सदर तक्रारीचे अनुषंगाने तक्रारीतील नमुद जागा ही खाजगी आहे किंवा सरकारी या बाबत पडताळणी करणेकामी समितीने निर्देश दिलेले आहेत.<br>➤ सदर तक्रारीचे अनुषंगाने केलेल्या स्थळपाहणी दरम्यान सदरची जागा ही खाजगी स्वरुपाची असल्याचे निदर्शनास आलेले आहे.<br>➤ तसेच सदर तक्रारीचे अनुषंगाने महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सोबत अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांचेकडील अहवालाची प्रत |



ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ /२५३४ १७३७ /३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

तक्रार क्र. १७

# महाराष्ट्र शासन

## अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता :- प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०१ १०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.

दुरध्वनी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी -tahmirabhayander@gmail.com

क्र.महसुल/कांदळवन/कावि-८८१/२०२० दिनांक : ०१/१०/२०२०

प्रति,
मा. उप वनसंरक्षक
कांदळवन कक्ष, मुंबई

विषय : श्री. धिरज परब यांच्या ७/११ क्लबच्या तक्रारीबाबत...

संदर्भ :१. आपलेकडील पत्र क्र. जा.क्र./ल.ले./९९/सन २०१९-२० दि. ०७/०१/२०२०
२. मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील पत्र क्र. महसुल/क-१/टे-४/धीरज परब कांदळवन तक्रार/०२/२०२० दि. २८/०२/२०२०
३. मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र. मनपा/प्र.क्र.०४/१८९४/२०१९-२० दि.२०/०३/२०२०
४. मंडळ अधिकारी भाईंदर यांचेकडील पत्र क्र. जा.बा.नि.क्र. २६१/२०१९-२० दि. १०/०९/२०२०

उपरोक्त विषयाबाबत मौजे नवघर ता.जि.ठाणे स.नं.५०,५१, ६८, ६९ व ८१ पै सेव्हेन इलेव्हेन क्लबजवळ MRSAC २००५ च्या नकाशानुसार सदर ठिकाणी कंदळवनावर माती भराव नूतनीकरणाचे काम करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले असुन सदर ठिकाणी मा.उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्रं.८७/२००६ आदेशाचे व CRZ चे देखील उल्लंघन केल्याचे आपलेकडील संदर्भीय पत्र क्र. १ मध्ये नमूद केलेले आहे.

त्या अनुषंगाने सदर जागेचे दि.०४.०३.२०२० रोजी सर्वेक्षण करण्यात आले. सदर सर्वक्षणाच्या वेळी १) श्री.दिपक अनारे, मंडळ अधिकारी भाईंदर २) तलाठी सजा नवघर, श्री. रोहन अशोक वैष्णव, ३) मिरा भाईंदर महानगरपालिका, नगररचना विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री.यशवंतराव देशमुख, ४) श्री. एम. बी. राणे सर्वेअर यांचे सहाय्यक श्री.संतोष हे उपस्थित अधिका-याच्या समवेत झालेल्या सर्वेक्षणांनुसार मंडळ अधिकारी भाईंदर यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

१) मौजे नवघर ता.जि.ठाणे जमीन स.नं. ५० क्षेत्र १-२३-९० (हे.आर.) कब्जेदार सदरी श्रीम.कमलाबाई चंद्रकांत व इतर व फेरफार क्रं.१०३३ अन्वये क्षेत्र ०-६१-९५ (हे.आर) कब्जेदार सदरी सेवेन इलेव्हेन हॉटेल्स प्रा. ली. चे डायरेक्टर श्री. विनोद लालचंद मेहता यांच्या नावाची नोंद दिसून येत आहे. त्याचबरोबर ७/१२च्या इतर हक्क सदरी भोगवटाधारकाची देखील नावे नमूद असल्याचे दिसून येत आहे. सर्वे नं. ५० या जागेच्या ठिकाणी सेवेन-इलेव्हेन हॉटेल्स प्रा.लि. यांची पत्र्याची संरक्षक भिंत आढळून आलेली आहे. उर्वरित जागेवर पाणी साठलेले दिसून येते. सदर ७/१२ सदरी सामाईक खातेदारांचे वेगवेगळे क्षेत्र नमूद असून प्रत्यक्षात जागेवर त्याप्रमाणे हद्दी नाहीत. त्यासाठी सदर जमिनीचे हिस्सेप्रमाणे मोजणी करणे आवश्यक आहे.

२) मौजे नवघर, ता.जि ठाणे स.नं.५१, हिस्सा क्रं.१ क्षेत्र ०-५४-४० (हे.आर) कब्जेदार सदरी सदानंद वासुदेव पाटील व इतर यांचे नाव दाखल असून फेरफार क्रं. (९४४) अन्वये क्षेत्र ०-३६-२७ (हे.आर) करिता सेवेन इलेवेन

तसेच वरील नमूद सर्वे नंबर संदर्भात तलाठी सजा नवघर यांनी यापूर्वीच मिरारोड येथील पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल असल्याबाबतची माहिती दिली. त्यानुसार **सर्वे क्रं.५०, ५१/३, ६८/२, ६९/२ व ३ या जागेत सेवेन इलेव्हेन हॉटेल प्रा. लि. चे डायरेक्टर श्री. विनोद लालचंद मेहता व इतर जमीन मालक यांनी माती भराव करून कांदळवनाचे नुकसान केल्यामुळे यापूर्वीच सेवेन इलेव्हेन हॉटेल्स प्रा.लि. चे डिरेक्टर श्री. विनोद लालचंद मेहता व इतर जमीन मालक यांचाविरोधात गुन्हा क्रं. १) II १२/२०१० दाखल करणेत आलेला आहे.** तसेच **सर्वे क्रं.६९ हि. क्रं.१,२, व इतर सर्वे क्रमांक या ठिकाणी काही भागात मातीभराव करून सपाटीकरण करण्याचे काम चालू असल्याचे व सदरचे काम कांदळवना लगत सीआरझेड, पाणथळ क्षेत्रामध्ये होत असल्याचे निदर्शनास आल्यावरून श्री. विनोद लालचंद मेहता व श्री. प्रशांत नारायण केळूस्कर व इतर जमीनमालक यांच्याविरुद्ध यापूर्वी मिरारोड येथील पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्रं.०१८९, २) II ३४/२०१५ दि.१९/०६/२०१५, ३) II ४७/२०१५ दि.०४/१०/२०१५, ४) II ५२/२०१५ दि.१९/११/२०१५, ५) II/२७४/२०१६ दि. ०९/१२/२०१६ ६) ०२१७/२०१९ दि. २१/०९/२०१७, ७) १८९/२०१८ दि. १५/०५/२०१८ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.**

तरी प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचे निर्देशानुसार वरीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करीत आहोत. सोबत मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील अहवाल, मंडळ अधिकारी भाईंदर यांचेकडील मूळ अहवाल, तसेच संबंधित सर्व ७/१२ उतारे, गुन्हे दाखल केलेबाबत FIR ची छायांकित प्रत सादर करीत आहोत.

**(डॉ. नंदकिशोर देशमुख)**
**अपर तहसीलदार मिरा-भाईंदर**

प्रत:- मा.जिल्हाधिकारी, ठाणे (महसूल शाखा) यांजकडे माहितीस्तव सविनय सादर.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 360
दिनांक 19-10-2020
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक